माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - १४२/२०१८/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| श्री. दामोदर मारुती दांगट | जन माहिती अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे |

(निर्णय दिनांक- ०८/०१/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक ०५/१०/२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ३४०१/२०१६/पुणे यामध्ये दिनांक २३/०३/२०१८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि सदर आदेश पारित होवून अद्याप माहिती मिळाली नाही, अशी तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र. १४२/२०१८/पुणे / 6753/2025

दिनांक - 8/1/2025